सकाळ



कोल्हापूर : शिवाजी पार्कातील इंदिरानगर परिसरातील जळीतग्रस्त कुटुंबांना श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे मदत देण्यात आली. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, कोल्हापूर शाखाध्यक्ष विजय हरगुडे, प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, डी. के. मायदेव, पंकज कुंभार.

# जळीतग्रस्त कुटुंबांसाठी धावला 'रवळनाथ' परिवार

## २० कुटुंबांना एक लाखाची मदत

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी पार्क इंदिरानगर परिसरातील जळीतग्रस्त झोपडपट्टीवासीय कुटुंबासाठी श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे मदत देण्यात आली.

२० कुटुंबांना प्रत्येकी पाच हजार याप्रमाणे एक लाखाची मदत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली.

मंगळवार (ता. २९) दुपारी लागलेल्या आगीत २० कुटुंबांचे प्रापंचिक नुकसान झाले. याबाबतची माहिती मिळताच 'रवळनाथ' परिवाराने या कुटुंबाला मदतीसाठी पुढाकार घेतला. चित्रदुर्ग मठात तात्पुरता आसरा घेतलेल्या या कुटुंबाला मदतीची रोख रक्कम देण्यात आली. संस्थेचे ब्रँड अम्बॅसिडर ज्ञानेश्वर मुळे यांनी सुरू केलेल्या 'चांगुलपणाची चळवळ' या उपक्रमांतर्गत ही मदत देण्यात आली. कोणत्याही संकटात आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी धावून जाणारी संस्था अशी 'रवळनाथ'ची संपूर्ण जिल्ह्यात ओळख असल्याचे या वेळी चौगुले यांनी सांगितले. या वेळी कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष विजय हरगुडे, संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, शाखाधिकारी पंकज कुंभार, धीरज कुंभार, विशाल शिंदे, प्रदीप बोरीगडे, अजित माने आदी उपस्थित होते.